लोकमत



पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात एकूण ३३२ शौचालयांच्या उभारणीप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# दुर्गम भागात स्वच्छतागृहे उभारण्याचे कार्य कौतुकास्पद

## डॉ. कैलास शिंदे : फिनोलेक्स-मुकुल माधव फाउंडेशनकडून ३३२ शौचालयांची निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** ‘महाबळेश्वरसारखे गाव स्वच्छतेमध्ये पहिल्या क्रमांकावर येते आणि राज्यातील इतर काही गावांत स्वच्छतागृहच नाहीत, हा मोठा विरोधाभास आहे. सरकारच्या अनेक योजना आहेत, परंतु त्या तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे अशी गावे या योजनांपासून वंचित राहतात. गावात स्वच्छतागृह नसल्यामुळे महिला, मुली, बालके, वयोवृद्ध व्यक्तींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून ३३२ शौचालये उभारली गेली आहेत. या दुर्गम भागात त्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत पालघरचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी मुकुल माधव फाउंडेशनच्या कायार्चा गौरव केला.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनकडून खेरवाडी सोशल वेलफेअर असोसिएशनच्या युवा परिवर्तन संस्थेच्या सहकार्याने पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात एकूण ३३२ शौचालयांची उभारणी केली आहे. त्यातील पाचव्या टप्प्यात वाडा तालुक्यातील सांगेनाणे गावात १२५ शौचालयांचे व सौर दिव्यांचे उद्घाटन नुकतेच स्वच्छतेसाठी बकेट, मग आणि सफाईचे साहित्यही दिले. या वेळी तहसीलदार उद्धव कदम, फिनोलेक्सचे उपाध्यक्ष बी. आर. मेहता, बबलू मोकळे, मंगेश तळेकर, प्रांत अधिकारी अर्चना कदम, सरपंच कांचन संभारे, तलाठी श्रीकांत कुंभार, पोलीस पाटील सुरेश पाटील, युवा परिवर्तनच्या निकोला मोंटेरिओ, भगवान कांबळे, विस्तार अधिकारी संदीप जाधव, अनिल पाटील उपस्थित होते.